# आम्ही तेव्हा वात्रट होतो

प्रकाशित: हास्यांगण दिवाळी अंक २०१२

**रत्नाकर वाणी**

पुनरारंभ

© पुनरारंभ

**website:** http://www.rajratna.co.in **Email:** ratnakar.wani@rajratna.co.in

# आम्ही तेव्हा वात्रट होतो

वय झाले म्हणून काय झाले. गत काळाच्या स्मृति तर जशाच्या तशा अजून जागृत आहेत. जेव्हा जेव्हा मला माझी शाळा आठवते व बाजारात शेवग्याच्या शेंगा दिसतात तेव्हा तेव्हा आठवतो माझा वात्रटपणा व लहानपणी केलेल्या वात्रट खोडया.

आमची शाळा नगर जिल्ह्यात कोपरगाव तालुक्यातील कान्हेगाव रेल्वे स्टेशन जवळील सोमैया विद्यामंदिर. आमच्या शाळेची भव्य ३ मजली इमारत. प्रयोगशाळा, बॅडमिंटन हॉल, भव्य प्रेक्षागृह, वाचनालय इ.नी परिपूर्ण. तळमजल्यावर प्रवेशद्वाराजवळ शाळेचे कार्यालय होते. इमारतीच्या मध्यभागी तळमजल्यावर खुला व विस्तीर्ण असा हॉल होता. हॉलला वर लोखंडी ॲंगलच्या सहारे ऊन पावसाच्या बचावार्थ सिमेंटचे पत्रे लावले होते. तेथे सदैव कबुतरे असायची व त्यांची विष्टा खाली पडत असे. प्रार्थनेस उभे राहिल्यास हमखास कबुतरांची विष्टा अंगावर पडत असे. पावसाळयाच्या दिवसात सकाळी शाळा सुरू होण्यापुर्वी अकरा वाजता या हॉल मध्ये सामुहिक प्रार्थना होत असे.

एकेदिवशी सकाळी उशीर झाल्यामुळे प्रार्थनेस न जाता गंमत म्हणून मी पेनची शाई तिस–या मजल्यावरून खाली तळमजल्यावर प्रार्थनेस उभ्या असलेल्या मुलांच्या अंगावर शिंपडली. कबुतरांनी घाण टाकली असावी असा ग्रह झाल्याने त्याकडे दुर्लक्ष झाले. पण नंतर लक्षात आले ती शाई होती. पण कोणी टाकली हे कोणाला समजलेच नाही. मला मात्र गंमत वाटली.

काही दिवसांनी परत एकदा असाच उशीर झाल्यामुळे मी याची पुनरावृत्ती केली. माझ्या पेन मधील शाई संपली असल्यामुळे कार्यालयातून शिपाई श्री.मधुकर ननावरे यांना पाटील सरांनी शाईची बाटली मागीतली असे खोटे सांगून शाईची बाटली घेतली व तिस–या मजल्यावरून प्रार्थनेस खाली उभ्या असलेल्या मुलांच्या अंगावर न कळत शिंपडली. पण या वेळेस ती शाई मुलांच्या ऐवजी शिक्षकांच्या अंगावर उडाली आणी नेमके याच वेळेस पाटील सर काही कामासाठी वर आले. त्यांनी

मला पाहिले. माझा वात्रटपणा उघडकीस आला. सरांनी माझे कान धरून मला खाली आणले व सर्व विद्यार्थ्यासमोर मार तर दिलाच शिवाय शाळा सुटेपर्यंत कार्यालयाचे दाराजवळ उभे राहण्याची शिक्षा पण दिली.

माझा वात्रटपणा केवळ शाळेपुरताच नव्हता तर घरी पण असायचा. साकरवाडीला घरी आमच्या अंगणात पुढे व मागे असे दोन शेवग्याच्या शेंगांची झाडे होती. पुढच्या अंगणातील शेवगा गोड, तर मागील अंगणातील शेवगा कडू होता. साधारण रविवारी आम्ही गोड शेवग्याच्या शेंगा काढून शेजाऱ्यांना वाटत होतो.

एका रविवारी मला आली लहर व केला कहर. मागील अंगणातील कडू शेवग्याच्या शेंगा काढल्या व नेहमीप्रमाणे सकाळी सकाळी शेजारी नाईक काकू, भालेराव काकू व जोशी काकूंना देऊन आलो. त्यांनी भाजी केली ती सर्व कडू लागली म्हणून फेकून दिली.

संध्याकाळी नळावर सर्वजणी पाणी भरण्यास आल्या तेव्हा गप्पा सुरू झाल्या. गप्पांच्या ओघात भाजीचा विषय निघाला. जोशी काकूंनी भाजी कडू निघाल्याचे सांगितले. नाईक व जोशी काकूंनी देखिल त्याची री ओढली. त्यावेळी माझी आई तेथे उपस्थित होती. तिला ही गोष्ट सांगितली व अण्णाने आम्हास शेंगा आणून दिल्याचे सांगितले. आईने मी मागील अंगणातील शेंगा काढून दिल्याचे ओळखले व घरात येउन माझी धुलाई केली.